FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0167738

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. ७२, वर्ष २०२०, दिनांक २७/०३/२०२०
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. कायदा १९८८, कलमे Sections ७, १२
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून २५/०२/२०२० वेळ ........, तारीख पर्यंत २७/३/२०२० वेळ ........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २७/०३/२०२० वेळ ........
Information received at P. S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ४२/2020, तारीख २७/३/२०२० वेळ २३.५५
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा —, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. —
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव मुंबई जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई तालुका ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण बी.के.सी., गाव वांद्रा, पोस्ट पूर्व, तालुका मुंबई, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव —, तालुका —, जिल्हा —, राज्य —
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव रमिभाज युसुफ शेख (b) वडिलांचे / पतीचे नाव युसुफ शेख
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ४१ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ८६५५११७११६
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय कामदे सल्लागार
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता बी-६०८, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ड्रीम हब टाऊन गार्डेनिया, मिरा रोड, जि-ठाणे फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

(१) लोकसेवक श्रीमती मनिषा राजीव सिंह, वय - ४७ वर्षे, रा.ठी. ३-१०८, स्मरानी टॉवर, सेक्टर १५, कोर्टाच्या समोर, बेलापुर, नवी मुंबई.

(२) खाजगी इसम - महेश मारुती कटीगनी, वय ४२वर्षे, रा.ठी. बी/१ वाडिया चाळ, दत्त मंदिर रोड, वाकोला पुलाजवळ, सोनाक्रुझ (पु), मुंबई.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

फिर्यादी नामे इम्तियाज युसुफ शेख, वय ४२ वर्षे, रा. ठि. बी ६०७,
इरीस हब, टाऊन गार्डनिया, मिरा रोड, जि. ठाणे यांचा स्वतंत्र
कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हाच प्रथम खबर समजण्यात यावा.

समक्ष

(राहुल कारभारी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतीबंधक विभाग
मुंबई.

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CO… BUREAU

फिर्याद दिनांक २७/०२/२०२०

श्री. इम्तीयाज युसुफ शेख, वय ४२ वर्षे, धंदा– घर जमीन खरेदीविक्री सल्लागार, रा.ठि. बी/६०७, इरीस हब टाऊन गार्डेनिया, मिरा रोड जि.ठाणे.

——//——

मी वर नमूद केल्याप्रमाणे असून, नमूद ठिकाणी कुटुंबासह राहत आहेत. माझा मीरा रोड येथे अर्शिया इंटरप्रायझेस नावाने लिगल कन्सलटंन्सी व्यवसाय आहे. मी हौसिंग सोसायटी, जमिन खरेदी विक्री सल्लागार म्हणुन काम करतो. मला लिली व्हाईट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित सिटीएस नं. ३० बी, मजासगांव, पार्ट–३, शामनगर जोगेश्वरी–विक्रोळी लिंक रोड, मजास डेपोचे पुढे, जोगेश्वरी (पुर्व), मुंबई ६० या सोसायटीने सोसायटीच्या नावे जमिन हस्तांतरण करणे करीता अर्शिया इंटरप्रायझेसला सल्लागार म्हणुन नियुक्त केले आहे. त्या अनुषंगाने मी लिली व्हाईट सहकारी गृहनिर्माण संस्था, श्याम नगर, जोगेश्वरी पुर्व, मुंबई, चे मालमत्तेचे मुल्यांकन करण्यासाठी मी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ३१ अन्वये अंतरिम आदेश काढण्यासाठी आवश्यक दस्तऐवज हे मुद्रांक जिल्हा अधिकारी, अंधेरी तालुका, मुंबई यांचे कार्यालयात, फाईल क्र. अेडीजे ११००९००/७७/२०२० अन्वये दि.३०/०१/२०२० रोजी सादर केले आहे. सदर कार्यालयातील शासकिय अधिकारी श्रीमती मनिषा मॅडम (सहाय्यक नगर रचनाकार) यांना कामाची पुर्तता करणेकरीता वेळोवेळी भेटलो असता त्यांनी कामाची पुर्तता केली नाही. दि. २४/०२/२०२० रोजी श्रीमती मनिषा मॅडम यांना मुद्रांक जिल्हा अधिकारी, अंधेरी तालुका यांचे कार्यालयात भेटलो असता त्यांनी सोसायटीच्या प्रत्येक सभासदाकडून प्रत्येकी दोन हजार रूपये असे एकुण सभासद संख्या ६७ असुन त्यांचे एकुण रू.१,३४,०००/– लाचेची मागणी केली व त्यानंतरच लिली व्हाईट सहकारी गृहनिर्माण संस्थेची जमीन हस्तातरंणाची पुर्तता होईल असे मला सांगीतले.

शासकिय अधिकारी श्रीमती मनिषा सिंह ( सहाय्यक नगर रचनाकार ) या पैसे मागत होते ते पैसे कोणतीही शासकिय फी नव्हती अथवा ते मला त्या रक्कमेबावत कोणतीही पावती देणार नसल्याने माझी लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २५/०२/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहुन लेखी तक्रार दिली.

माझ्या तक्रारीवरून ला.प्र.वि कार्यालयाने दोन शासकिय पंचास त्यांचे कार्यालयात बोलाविण्यात आले. ते पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर पो.नि. कारभारी यांनी त्यांची व माझी ओळख करुन दिली. मी दिलेला तक्रार अर्ज पंचाना दाखविला व पंचांनी तो वाचला. मी सांगितलेली तक्रार व अर्जातील तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यावर त्या तक्रार अर्जावर पो.नि. कारभारी व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तो अर्ज पो.नि. कारभारी यांनी ताब्यात घेतला. पो.नि. कारभारी यांनी मला व दोन्ही पंचाना पडताळणी कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली.

दि. २५/०२/२०२० रोजी दुपारी मी व पंच क.२ श्री राजेंद्र त्रिभुवन यांचेसह लोकसेवक श्रीमती मनिषा आर. सिंह ( सहाय्यक नगर रचनाकार ) यांच्या पहीला माळा, मुंद्राक जिल्हाधिकारी कार्यालय, अंधेरी तालुका, बांद्रा पुर्व मुंबई ५१ येथे जाण्यापुर्वी माझ्या बनियनच्या आतील बाजूस कापडी पिशवीमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात आला. त्यानंतर मी व पंच क्र. २ श्री. त्रिभुवन असे लोकसेवक श्रीमती मनिषा सिंह यांचे कार्यालयात भेट घेण्यासाठी गेलो. मी श्रीमती मनिषा सिंह यांचेकडे लिली व्हाईट सहकारी गृहनिर्माण संस्थेची जमीन हस्तातरीत कामाबाबत चौकशी केली असता, लोकसेवक श्रीमती मनीषा सिंग यांनी 'काम करती हुँ ना' असे सांगितले तसेच यापुर्वी लोकसेवक व माझे भेटी दरम्यान ठरलेले, प्रती सभासद रुपये दोन हजार प्रमाणे ६७ सभासदांची एकत्रीत रु.१,३४,०००/– ची रक्कम कॅल्क्युटरवर टाईप करून मला दर्शवुन मागणी केली. सदरची रक्कम जास्त असल्याने ती रक्कम कमी करण्याबाबत लोकसेवक

Scanned with CamScanner

C.R.B.
F-I

श्रीमती मनिषा सिंह मॅडम यांना मी विनंती केली. लोकसेवक श्रीमती मनिषा सिंह मॅडम यांनी मागणी केलेल्या रक्कमेपैकी तडजोड करणेस विचारले त्यावेळी श्रीमती मनिषा मॅडम यांनी तडजोड म्हणुन रुपये १,२५,०००/– असा आकडा कॅल्क्युलेटरवर टाईप करून दाखविला तेव्हा मी १,२५,०००/–रुपये का? अशी विचारणा केली असता लोकसेवक श्रीमती मनिषा सिंह मॅडमने 'हो' असे होकार दर्शवुन ऑडीट झाल्यानंतर येण्यास सांगीतले. सदरवेळी पंच क्र. २ हे प्रत्यक्ष माझेबरोबर हजर होते.

मी परत पोलीस वाहना जवळ आलो तेव्हा मला विचारलेवरून मी घडलेली घटना सांगितली. त्यानंतर माझे व लोकसेवक यांच्यात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील एसडी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पंच व आम्ही सर्वानी ऐकले. त्यानंतर आम्ही सर्वजण ब्युरो कार्यालयात आलो. झालेल्या कारवाई संदर्भात सविस्तर पंचनामा, ट्रान्सक्रिप्ट करण्यात आली. लाचेकरीता देण्यासाठी आवश्यक रक्कम उपलब्ध करण्यासाठी मला एक दिवसाचा अवधी लागणार असल्याने पो.नि. कारभारी यांनी आम्हास दि.२७/०१/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता हजर राहण्याची सुचना दिली व त्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याने मला सांगितले.

मी दि.२७/०१/२०२० रोजी सकाळी ला.प्र.वि. कार्यालयास येवुन पो.नि. कारभारी यांना भेटलो. तेथे दोन्ही पंच व पोलीस पथक हजर होते. आम्हास सापळापुर्व व सापळा कारवाई संबधाने सविस्तर माहीती दिली.

लोकसेवक श्रीमती मनिषा सिंह मॅडम यांनी लाचेची रक्कम रुपये १,२५,०००/– सांगीतली होती परंतु माझेकडे रुपये ५०,०००/– उपलब्ध झाल्याचे मी पो.नि. कारभारी यांना सांगीतले मी माझे व्यवसायाच्या बचतीमधील रु.५०,०००/– रक्कम पो.नि कारभारी यांचेकडे दिली. पो.नि. कारभारी यांनी सापळा पुर्व कारवाईचे आयोजन केले. गोपनिय कक्षात सपोउनि निंबाळकर यांनी अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले. लाच म्हणून वापरण्यास दिलेल्या रक्कमेस ला.प्र.वि. कार्यालयातील अंमलदार श्री निंबाळकर यांनी दोन पंचासमक्ष अॅन्थ्रासीन पावडर लावुन सदरच्या नोटा खाकी रंगाच्या लिफाफ्यात टाकल्या त्या लिफाफ्याला देखील अॅन्थ्रासीन पावडर लावुन तो लिफाफा माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवला. इतर चीज वस्तु इतर खिशात ठेवल्या. त्यानंतर दोन पंचासह सापळा कारवाईत सहभागी असणारे पोलीस अधिकारी व अंमलदार एक खाजगी व दोन शासकिय वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालय परिसरात येवून थांबलो. तेथे आम्हास योग्य त्या सुचना दिल्या. लोकसेवक श्रीमती मनिषा सिंह यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डाव्या हाताने तोंडावरुन रुमाल वारंवार फिरवुन लाच स्विकारल्याबाबतचा पुर्वनियोजीत इशारा करण्याबाबत मला सांगितले.

लोकसेवक श्रीमती मनिषा सिंह यांच्या कॅबीन मध्ये पंच क्र. २ श्री.राजेंद्र त्रिभुवन यांचेसह मी गेलो. तेथे पंच क्र. २ त्रिभुवन यांच्या समक्ष लोकसेवक व माझे मध्ये चर्चा झाली. लोकसेवक श्रीमती मनिषा सिहं यांनी माझेकडे पंचासमक्ष कॅलक्युलेटर वर १२५ असा आकडा टाईप केला तो आकडा म्हणजे रु.१,२५,०००/– रुपये 'का'? असे विचारले असता हो म्हण्याला त्यांच्या होकारास खाजगी इसम महेश याने पुष्टी दिली त्यावेळी मी त्यांना सांगितले की, मी आता फक्त रु.५०,०००/– आणले आहेत तेव्हा श्रीमती मनिषा सिंह यांनी 'ठिक आहे' असे बोलून लाचेची रक्कम त्यांच्या कॅबीन मध्ये उपस्थित असलेले खाजगी इसम श्री महेश कट्टीमनी यांच्याकडे देण्याबाबत सांगितले. तसेच सदर लाचेची रक्कम रूपये ५०,०००/– लोकसेवक श्रीमती मनिषा सिंह मॅडम यांनी खाजगी इसम नामे महेश कटट्टीमनी यांस ती स्वीकारण्यास सांगितले. त्यानुसार मी

समक्ष

माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवलेला रु.५०,०००/— असलेला लिफाफा महेश यास दिला असता त्याने तो त्याचे उजव्या हाताने पैशाचा लिफाफा स्वीकारुन आपल्या पॅन्टीच्या पुढील उजव्या बाजुस असलेल्या खिश्यात ठेवला. महेश यांस पैसे मोजुन घेण्याबाबत सांगितले असता 'ठिक आहे, हे पैसे मॅडमकडेच जाणार आहेत'. असे महेश म्हणाला त्यानंतर लोकसेवक श्रीमती मनिषा सिंह मॅडम यांच्या कॅबीन मधुन मी बाहेर आलो. तेव्हा माझ्या पाठोपाठ महेश देखील कॅबीनच्या बाहेर आला. मी बाहेर येताच तोंडावरुन रुमाल वारंवार फिरवुन लाच स्विकारल्याबाबत पुर्वनियोजीत इशारा सापळा पथकास केला. तसेच माझ्या पाठीमागे असलेल्या महेश कडे बोट केले. मी केलेला इशारा पाहून बाहेर हजर असलेले लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील अधिकारी व अंमलदार यांनी खाजगी इसम महेश कटट्टीमनी यांस लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले. व लागलीच श्रीमती मनिषा सिंह यांच्या कॅबीन मध्ये जावून सापळा पथकाने आपली ओळख करून देवून सापळा कारवाई संबधाने त्यांना माहिती दिली. पंचासमक्ष खाजगी इसम महेश कटट्टीमनी यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात खाकी लिफाफा मिळून आला तो पंचासमक्ष उघडून पाहिला असता त्यामध्ये रु. २,०००/— दराच्या २५ भारतीय चलनी नोटा मिळून आल्या त्या नोटांची सपळापुर्व पंचनाम्यातील नोटांशी पडताळणी केली असता त्या नोटा त्याच असल्याचे दिसुन आले. सदर नोटा पंच क्र.१ सहातोंडे यांच्या ताब्यात देण्यात आल्या.

सापळा पथकातील सदस्य, पंच क्र. २ याची कृत्रिम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याखाली तपासणी केली तेव्हा कोणाचेही अंगावर अथवा हतावर हिरवट फिक्कट रंगाची चकाकी दिसून आली नाही. मात्र खाजगी इसम महेश कट्टीमनी व माझे हात, कपडे याची कृत्रिम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याखाली तपासणी केली असता माझे व श्री. महेश कट्टीमनी दोघाचे उजव्या हतावर हिरवट फिक्कट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे आलो. तेथे पुढील पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आली.

दिनांक २५/०२/२०२० रोजीची पडताळणी तसेच दि.२७/०२/२०२० रोजीच्या सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान माझे व लोकसेवक मनिषा सिंह यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील एसडी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे.

मी अर्शिया इंटरप्रायझेस नावाची लिगल कन्सलटंन्सी व सर्विस प्रोव्हायडर म्हणुन, हौसिंग सोसायटीची जमीन खरेदी—विक्री सल्लागार म्हणून काम करतो. लिली व्हाईट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जोगेश्वरी या संस्थेची जमीन हस्तांतरण करण्याकरीता व मालमत्तेचे मुल्यांकन करण्यासाठी, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अंधेरी तालुका, बांद्रा (पूर्व), मुंबई या कार्यालयात प्रकरण सादर केलेले होते. सदरच्या प्रकरणाची पुर्तता करण्यासाठी तेथील लोकसेवक श्रीमती मनिषा राजीव सिंह (सहाय्यक नगर रचनाकार) यांनी सोसायटीच्या प्रत्येक सभासदाकडून प्रत्येकी रुपये दोन हजार प्रमाणे रु. १,३४,०००/— लाचेची मागणी केली. दिनांक २५/०२/२०२० रोजी आलोसे श्रीमती मनिषा राजीव सिंह हिने तडजोडीअंती कॅलक्युलेटरवर पंचासमक्ष स्वत:करीता रु. १,२५,०००/— टंकलेखित करुन दाखविले व लाचेची मागणी केली त्यास खाजगी इसम श्री. महेश कट्टीमनी यांनी प्रोत्साहन दिले.

समक्ष
[signature]

[signature]

Scanned with CamScanner

दि.२७/०२/२०२० रोजी मागणी केलेली रक्कम खाजगी इसम महेश मारुती कट्टीमनी यांच्याहस्ते स्विकारली असता लोकसेवक श्रीमती मनिषा राजीव सिंह व खाजगी इसम महेश यास रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी त्यांच्याविरुध्द् कायदेशीर फिर्याद आहे. लोकसेवक श्रीमती मनिषा राजीव सिंह यांच्याशी माझे पुर्ववैमनस्य नाही तसेच त्यांचेसोबत कोणताही वैयक्तिक आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असुन तो मी वाचुन पाहिला तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( राहुल कारभारी )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..............................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ..............................

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वरील नमुद ता.वे. व ठिकाणी फिर्यादी शेख यांना सोसायटीचे नावे जमिन हस्तांतरण करणेकरीता सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले होते. सदर प्रतिभेतील मालमत्तेचे मुल्यांकन करण्यासाठी मुंबई मुद्रांक अधि १९५८ च्या कलम ३१ अन्वये अंतरीम आदेश काढण्यासाठी यातील आलोसे यांनी सोसायटीच्या प्रत्येक सभासदाकडून (प्रत्येकी दोन हजार रुपये) प्रमाणे एकुण ६७ सभासदांकडून १,३४,०००/- रु असे सांगुन तडजोडी अंती रु १,२५,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन रु. ५०,०००/- लाचेची रक्कम शासकीय पंचासमक्ष आरोपी खाजगी इसमामार्फत स्विकारताना लोकसेवकास रंगेहात पकडले म्हणुन कलम ७,१२ भ्र.प्र. अधि १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. राहुल कारभारी

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..................., जिल्हा ..................., राज्य ...................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................

District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ... राहुल कारभारी

पदनाम Rank... पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ..............................

Posting

Code No. of I. O. ..............................

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..............................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner